प्रजावाणी दि. 17/09/2024

# दोन घटनेतील आरोपींना देगलूर पोलिसांनी केली अटक

**वार्ताहर • देगलूर**



शुक्रवारी रात्री मुख्याधिकारी यांच्या घराला टार्गेट करणारा व याच दिवशी एक दुचाकी पळवणारा अशा दोन घटनेतील दोन आरोपींना पोलीस निरीक्षक मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाने २४ तासाच्या आत म्हणजेच शनिवारी (दि.१४) रात्री बेड्या ठोकल्या.

येथील नगरपालिकेचे मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांच्या घराच्या खिडकीचे ग्रील तोडून घरात प्रवेश करून चोरीचा प्रयत्न करणाऱ्या चोरट्यांचा सीसीटीव्ही फुटेज व गुप्त बातमीद्वारे शोध घेतला असता गोविंदसिंग बब्बर सिंग टाक (हमु. क्रांतीनगर देगलूर) यास शनिवारी डीबी पथकाने जेरबंद केले. याच घटनेतील आरोपी टाक याचा साक्षीदार फरार आहे. याच दिवशी शहरातून एक दुचाकी पळवून नेल्याची घटना घडली होती. याचाही पोलीस शोध घेत होते. यादरम्यान एसबीआय कॉर्नरजवळ एक संशयित मिळून आला. याची चौकशी केली असता, त्याने दुचाकी चोरल्याची कबुली दिली. दुचाकी चोरी प्रकरणी व्यंकटेश मुथराज (रा. बोधन) यास डी.बी. पथकाने जेरबंद केले आहे. ही कारवाई सुधाकर मलदेवडे, साहेबराव सगरोळीकर, माधव मरगेवार, शिवाजी आडबे, राजवंतसिंग महाराज, वैजनाथ मोटरगे यांनी केली आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

शहरातील एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत जबरदस्तीने वारंवार शारीरिक संबंध ठेवून तिला गरोदर केले. तसेच याची कुठे वाच्यता केल्यास तुला खतम करतो, अशी जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी एका २५ वर्षीय तरुणावर देगलूर पोलीस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अल्पवयीन मुलगी असल्याचे माहित असतानाही मुळ माळटेकडी नांदेड येथील (ह.मु. देगाव नाका) येथील रहिवासी नयूम कुरेशी (वय २५) याने जबरदस्तीने त्या अल्पवयीन मुलीशी शारीरिक संबंध ठेवले. त्यात ती गरोदर झाली. याची वाच्यता केल्यास तुला खतम करतो, असे म्हणून जीव मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी फिर्याद दाखल होताच उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी, पोनि मारुती मुंडे , सपोनि पवार व पोउपनि नरहरी फड यांनी पीडितेकडून घटनेची माहिती जाणून घेतली. या प्रकरणातील शारीरिक अत्याचार करणाऱ्या नराधमाविरुद्ध रविवार (दि.१६) गुन्हा दाखल केला आहे. आरोपी फरार असून त्यास जेरबंद करण्यासाठी पोलीस शोध घेत असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक नरहरी फड यांनी दिली आहे.

गोदातीर दि. 17/09/2024

# दुचाकीचोरांच्या टोळीतील एकाला अटक; ११ दुचाकी जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**नांदेड–** शहर व जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून दुचाकी चोरीच्या घटना वाढल्या होत्या; परंतु ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत सुरू असलेल्या कारवाईमध्ये स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला चांगलेच यश आले असून दुचाकी चोरट्याला अटक करून त्याच्याकडून ११ चोरीच्या दुचाकी जप्त केल्या आहेत.

जिल्ह्यातील लिंबगाव, बारड, अर्धापूर आणि विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये दुचाकी चोरी करणारी टोळी मागील काही दिवसांपासून सक्रिय झाली होती. दुचाकी मालकाची नजर चुकताच हे चोरटे दुचाकी पळवायचे; परंतु पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या आदेशावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी आपले सहकारी पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांच्या टीमला अशा गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्याच्या सूचना दिल्या. मिलिंद सोनकांबळे यांनी अंमलदार दीपक ओढणे, माधव केंद्रे, राजू सिटीकर, रवी बामणे, बालाजी तेलंग, विठ्ठल शेळके आणि बालाजी यादगीरवाड यांची मदत घेत अर्धापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून गणपुर कामठा येथील विकास ग्यानबा घाडगे (वय २४) याला अटक केली. त्याची कसून चौकशी केली असता त्याने भाग्यनगर, बारड, अर्धापूर आणि विमानतळ पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये दुचाकी चोरीचे आपल्या दोन अन्य मित्रांसोबत गुन्हे केल्याची कबुली दिली. पोलिसांनी विकास घाडगे याच्याकडून वेगवेगळ्या ठिकाणी लपवून ठेवलेल्या चार लाख ६० हजार रुपये किमतीच्या ११ दुचाकी जप्त केल्या. विकास घाडगे याच्याविरुद्ध अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.